POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-७५ ● मुंबई, शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### महाराष्ट्र सागरी मंडळाच्या कर्मचाऱ्यांनाही बोनस जाहीर

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या कर्मचाऱ्यांनाही दीपावली निमित्त सानुग्राह अनुदान जाहीर झाले आहे. मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी याची घोषणा केली आहे. सागरी मंडळाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रथमच बोनसचा लाभ मिळणार आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या बैठकीत मंत्री राणे यांनी ही घोषणा केली आहे. कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना ५० हजार रुपये, तर कंत्राटी कर्मचाऱ्यांना २० हजार रुपयांचा बोनस मिळणार आहे.

### महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांना १४ टक्के बोनस

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांनाही १४ टक्के बोनस जाहीर झाला आहे. राज्य सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांना यंदा सर्वाधिक १४ टक्के बोनस जाहीर झाला आहे. या वर्षात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला ६९१ कोटींचा विक्रमी नफा झाला आहे. या नफ्याच्या रकमेतून हा दिवाळी बोनस दिला जाणार आहे. बँकेत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सुद्धा १० हजार रुपये इतका बोनस जाहीर करण्यात आला आहे.

### वाशिष्टी डेअरी उद्योग समूहाकडून दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना बोनस

चिपळूण दुग्धोत्पादन क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. वाशिष्टी डेअरी उद्योग समूहाच्या वतीने संलग्न दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर केला आहे. या निर्णयानुसार एकूण ५४२ शेतकऱ्यांना ४८ लाख ६५ हजार ७५४ रुपयांचा बोनस वितरित केला जाणार आहे. दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देऊन त्यांना अधिक उत्पादनक्षम करण्याच्या उद्देशाने हा बोनस देण्यात येत असल्याचे प्रशांत यादव यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## यंदाचा वेळस कर्मचाऱ्यांची दिवाळी जोरात

# मुंबई पालिकेच्या ३१ हजार रुपयांचा बोनस जाहीर, तर...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी गोड झाली आहे. मुंबई महानगर पालिकेच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना ३१ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर झाले आहे. दीपावली २०२५ करता ३१ हजार सानुग्रह अनुदान जाहीर करण्याचा निर्णय महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांनी घोषित केला आहे. त्यामुळे महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मुंबई महानगर पालिकेच्या खालील वर्गवारीच्या कर्मचाऱ्यांना आज दीपावली झ २०२५ करीता ३१ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले आहे. यात महानगर पालिका अधिकारी आणि कर्मचारी, अनुदान प्राप्त खासगी प्राथमिक शाळा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, पालिका प्राथमिक शाळेतील तसेच अनुदानप्राप्त खासगी प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवक, माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी (अनुदानित आणि विनाअनुदानित), माध्यमिक शाळेतील शिक्षण सेवक (अनुदानित आणि विनाअनुदानित), अध्यापक



विद्यालय अधिव्याख्याते आणि शिक्षकेतर कर्मचारी (अनुदानित आणि विनाअनुदानित), अध्यापक विद्यालय शिक्षण सेवक (पूर्ण वेळ) (अनुदानित आणि विनाअनुदानित) आदींचा समावेश असून यांना ३१ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर झाले आहे.

सामाजिक आरोग्य स्वयंसेविका यांना भाऊबीज भेट म्हणून रुपये १४,००० तर बालवाडी शिक्षिका आणि मदतनीस यांना भाऊबीज भेट म्हणून रुपये ०५,००० भेट देण्याचा निर्णय मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी घेतला आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री अजित पवार यांनी महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**केडीएमसी कर्मचाऱ्यांना २०,००० रुपयांचा बोनस जाहीर**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस जाहीर झाला आहे.. यंदा दिवाळीनिमित्त कर्मचाऱ्यांना २०,००० रुपये बोनस मिळणार आहे. सुरुवातीला शिवसेना शिंदे गटाकडून कर्मचाऱ्यांसाठी २५ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र आज शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी थेट आयुक्तांची भेट घेत बोनस संदर्भात चर्चा केली. आयुक्तांनी २० हजार रुपयांचा बोनस निश्चित केल्याची माहिती शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी दिली आहे. हा बोनस जाहीर झाल्याने केडीएमसीमधील कायम कर्मचारी, परिवहन कर्मचारी आणि शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांची दिवाळी यंदा चांगलीच गोड होणार आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा बोनसच्या रकमेत वाढ झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरणआहे.

**केडीएमसी आशा वर्करानाही दिलासा**

केडीएमसीचा बंद केलेला आशा वर्करांचा बोनस पुन्हा सुरू झाला आहे. या ४५० आरोग्यसेविकांना दिवाळीपूर्वी प्रत्येकी ५,००० बोनस जाहीर झाला आहे. म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने निर्णय घेतल्याची संघटना अध्यक्ष सचिन बासरे यांनी माहिती दिली आहे.

**वसई – विरार पालिका कर्मचाऱ्यांना २२ हजाराचा दिवाळी बोनस**

वसई - विरार शहर महानगर पालिकेतील कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे. आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी दिवाळीच्या सणांच्या मुहूर्तावर ३ हजार ६४० कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २२ हजारांचा बोनस जाहीर केला आहे. यामध्ये पालिकेतील कायम स्वरुपी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत २ हजारांनी वाढ करण्यात आली आहे. यामुळे ८ कोटी ८ लाखांचा भुर्दंड पालिकेच्या तिजोरीवर पडणार आहे.

# ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट

## मुंबई-ठाण्यात अचानक कोसळधार, दिवाळीच्या उत्साहावर विरजण

**■मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्राची राजधानी मुंबईला आज पुन्हा एकदा पावसाने झोडपलं आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई, ठाणे जिल्ह्यात पावसाने विश्रांती घेतली होती. त्यामुळे नागरिकांनी देखील सुटकेचा श्वास सोडला होता. यावर्षी राज्यभरात पावसाने थैमान घातल्याचं बघायला मिळालं होतं. अनेक ठिकाणी पूर आलेला होता. महापुराने अनेक संसार उद्ध्वस्त केली, शेतीचं नुकसान केलं. राज्यातील शेतकरी या संकटातून कुठेतरी सावरत असताना परतीच्या पावसाने पुन्हा आगमन केलं आहे. त्यामुळे राज्यातील शेतकरी धास्तावले आहेत. या परतीच्या पावसामुळे आज मुंबई आणि ठाण्यातील सर्वसामान्य नागरिकांनादेखील



प्रचंड मनस्तापाला सामोरं जावं लागलं आहे.

राज्यभरात सध्या दिवाळीचा उत्साह आहे. उद्यापासून दिवाळी सणाला सुरुवात होणार आहे. उद्या वसूबारस असणार आहे. त्यामुळे दिवाळीच्या पूर्वसंध्येला बाजारपेठांमध्ये गर्दी बघायला मिळत आहे. अनेक जण नवीन कपडे खरेदी करत आहेत, कुणी दिवे खरेदी करत आहेत, तर कुणी कंदील खरेदी करत आहे. प्रत्येक जण वेगवेगळी खरेदी करत आहे. घराघरात उत्साहाचं वातावरण आहे. पण या उत्साहावर परतीच्या पावसाने विरजण पाडलं आहे. कारण अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली आहे. तसेच व्यापाऱ्यांचंदेखील नुकसान झालं आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई इथे आज नेहमीप्रमाणे कडक ऊन पडलं होतं. त्यामुळे उकाड्याने नागरीक हैराण झालं होतं. या भागातील नागरीक सध्या ऑक्टोबर हिटचा सामना करत असताना बघायला मिळत होतं. कारण सकाळी दहा वाजेपासून तीव्र ऊन पडताना दिसत होते. यामुळे आता हिवाळा कधी सुरु होईल, याची वाट नागरीक पाहत होते. पण आज संध्याकाळनंतर अचानक वातावरणात मोठा बदल झाला. वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस सुरु झाला. असा अचानक पाऊस पडेल अशी कुणालाही कल्पना नव्हती. त्यामुळे दिवाळीनिमित्त खरेदीसाठी गेलेल्या नागरिकांची मोठी तारांबळ उडाली.

कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ दूध संघाच्या ताराबाई पार्क ऑफिस समोर झालेला हा राडा.. दूध संस्था प्रतिनिधी, दूध उत्पादकानी कर्जरोखा रक्कम परत मिळावी यासाठी केलेलं हे आंदोलन.यावेळी आंदोलकांनी आपल्यासोबत आणलेल्या गाई म्हशी गेट तोडून आत नेण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस आणि दूध संस्था प्रतिनिधीमध्ये जोरदार धक्काबुक्की झाली. यामुळे ताराबाई पार्कमधील गोकुळच्या ऑफिस समोर जोरदार राडा झाला.

# कोल्हापुरात गोकुळवरील मोर्चात अभूतपूर्व राडा, गाई-म्हशी गेट तोडून आत नेण्याचा प्रयत्न

**■मुंबई। प्रतिनिधी,**

कर्ज रोख्यांच्या मुद्यावरून कोल्हापूरच्या गोकुळ दुध संघाविरोधात जोरदार मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात आंदोलक आणि पोलिसांची जोरदार झटापट झाली. आंदोलकांनी मोर्चात जनावरे आणल्याने पोलिसांकडून जनावरे हटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. आणि त्यानंतर अभूतपूर्व राडा पाहायला मिळाला. गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आलं. त्यामुळे गोकुळ दूध संघातील राजकारण यापुढे जोरदार तापणार याची झलक आज पाहायला मिळाली.



गोकुळने कर्जरोखा रक्कम तब्बल ४० टक्के कपात केल्यानंतर गोकुळ दूध संघाशी संलग्न असणाऱ्या संस्था आणि दूध उत्पादकामध्ये संतापाची लाट उसळली. दरवर्षी १० ते १५ टक्के रक्कम कपात होत असताना यंदा ४० टक्के रक्कम कपात करण्यात आली आहे. याचा थेट परिणाम संस्था चालकांच्या तिजोरीवर पडला.

गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक यांनी समर्थन देत आजच्या मोर्चाचे नेतृत्व केले... शौमिका महाडिक यांनी संस्थाचालकांची भूमिका लावून धरत कर्जरोखा रक्कम काही केल्या परत मिळाला पाहिजे अशा प्रकारची भूमिका मांडली.

गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक यांनी या मोर्चानंतर गोकुळच्या व्यवस्थापकीय संचालक आणि विद्यमान संचालिका यांची भेट घेतली. त्यावेळी डिबेंचरच्या संदर्भात संचालक मंडळाच्या बैठकीत दूध उत्पादकांसाठी सकारात्मक निर्णय घेतला जाईल असं आश्वासन गोकुळचे ज्येष्ठ संचालक अरुण डोंगळे यांनी दिलंय.

गोकुळमध्ये सध्या राष्ट्रवादीचे मंत्री हसन मुश्रीफ आणि काँग्रेस आमदार सतेज पाटील यांच्या पॅनलची सत्ता आहे. पण मध्यंतरी गोकुळचे अध्यक्ष निवडीमध्ये मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून गोकुळ मध्ये महायुतीचाच अध्यक्ष व्हावी अशी भूमिका घेतली. त्यानंतर मंत्री हसन मुश्रीफ यांचे चिरंजीव नावेद मुश्रीफ यांची निवड करण्यात आली. त्या निवडीनंतर गोकुळवर महायुतीची सत्ता आल्याचा दावा करण्यात आला. पण दुसरीकडे मात्र गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक यांनी कर्जरोख्याच्या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांना चांगलंच घेरलं आहे. त्यामुळे आगामी गोकुळच्या पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी विरोधात गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक या अशाच पद्धतीने मोठं रान उठवतील असं सध्या तरी दिसत आहे.

## कारागृहात ड्रग्ज पार्टी? प्रशासनाकडून तपास सुरु

# नाशिक मध्यवर्ती कारागृहातील व्हायरल

**■नाशिकरोड। प्रतिनिधी,**

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात कैदी ड्रग्ज घेतानाचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले असून, कैद्यांचे रील्सही उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, हे फोटो जुने असून याच कारागृहातील आहेत का, हेही तपासले जात आहे.

कारागृहात मोबाइल ठेवण्यास कैद्यांना प्रतिबंध असतानाही नाशिकरोड कारागृहात कैद्यांकडे मोबाइल मिळाल्याप्रकरणी नाशिकरोड पोलिस ठाण्यात या आधी अनेकदा गुन्हे दाखल झाले आहेत. या कारागृहात २०१६ साली २४ नोव्हेंबर २०१६ ला सात, तर २३ डिसेंबर रोजी आठ मोबाइल सापडले होते. २६ डिसेंबर रोजी तीन कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते. २७ डिसेंबर रोजी कारागृहात अधीक्षकांसह इतर अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता मोबाइल सापडल्याची नोंद आहे. यामुळे कारागृहाच्या सुरक्षेचा प्रश्न चिंतेचा झाला होता. २३ डिसेंबर २०१६ रोजी संशयास्पद कैद्यांना इतर कारागृहात हलविले होते. मोबाइल कारागृहात जाऊन चार्जिंग कसे होतात, त्यांना कर्मचारी मदत करतात का? आदी प्रश्न तेव्हा निर्माण झाले होते. अनेक कर्मचाऱ्यांची चौकशीही झाली होती.

कैद्यांच्या हाणामाऱ्या, कर्मचाऱ्यांवर हल्ला, प्रशासनाविरुद्ध उपोषण, कारागृहात मोबाइल, अमली पदार्थांचा कारागृहात प्रवेश यामुळे हे कारागृह चचेर्चा विषय ठरले. प्रशासनाचा खुलासा कारागृह अधीक्षक अरुणा मुकुटराव म्हणाल्या की, गेल्या काही वर्षांपासून कैद्यांसाठी गळाभेटीसारखे अनेक स्तुत्य उपक्रम राबवले जात आहेत. कारागृह प्रशासन पारदर्शी झाले आहे. हे पाहवले जात नसल्याने काही आत्मसंतुष्टांनी हे जुने फोटो व व्हिडीओ मुद्दाम व्हायरल केले आहेत.

काही कैदी सुटीवरून कारागृहात येताना ड्रग्ज, तंबाखू प्लास्टिकची पुंगळी करून ती लपवून आणतात. मातीची चिलिम बनवतात व नजर चुकवून तंबाखूचे सेवन करतात. व्हायरल झालेले फोटो, व्हिडीओ जुने असून, ते या कारागृहातीलच आहेत का याची खात्री केली जात आहे. त्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासून या प्रकरणी सखोल चौकशी केली जाईल.

**बंद्याची शिपायास मारहाण**

मंगळवारी सायंकाळी बंदिवानांना घेऊन जाताना एक शिक्षाबंद्याने कारागृह सुरक्षा दलातील शिपायास लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना कारागृहात सव्वापाच वाजेदरम्यान घडली. कारागृह शिपाई भाईदास भोई यांनी नाशिकरोड पोलिसांत दिलेल्या फियार्दीवरून शिक्षाबंदी बिलाल अली हुसेन शेख याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### ... असे आहेत आरोप

नाशिकरोड कारागृहात राज्यातील कुख्यात गुन्हेगार तसेच बॉम्बस्फोटातील दहशतवादी शिक्षा भोगत आहेत. परदेशी कैदीही आहेत. मुंबई आणि पुण्यामधील अनेक सराईत गुन्हेगारांच्या टोळ्यांचे सदस्य येथे आहेत. या टोळ्या राजकीय प्रभावाचा वापर करून व्हीआयपी ट्रीटमेंट मिळवण्याचा प्रयत्न करतात. कारागृह प्रशासनाशी त्यांचे आर्थिक हितसंबंध असल्याचाही आरोप होतो. गुन्हेगारांना वेगळे जेवण देणे, प्रकृती खालावल्याच्या नावाखाली जिल्हा रुग्णालयात दाखल करणे, कैद्यांना मोबाइल, अमली पदार्थ, चैनीच्या वस्तू पुरवणे आदी सुविधा दिल्या जातात असादेखील आरोप केला जात आहे. अनेकदा गुन्हेगार कारागृहातून आपल्या टोळ्या चालवत असल्याचे उघड झाले आहे. व्हायरल झालेल्या फोटोमध्ये वरील टोळ्यांचे सराईत गुन्हेगार असल्याची चर्चा असून, हे गुन्हेगार पुण्यातील आणि मोक्क्यासारख्या गंभीर गुन्ह्यातील असल्याचा दावा केला जात आहे.

# तब्बल ४८ वर्षांनंतर फरार आरोपीला कोकणातून अटक

**■नांदेड। प्रतिनिधी,**

काही गुन्हे हे त्यांच्या संपूर्ण घटनाक्रमामुळं, थरारामुळं आणि गुन्ह्याच्या स्वरुपामुळं चर्चेत असतात. तर, काही त्यांच्यावर होणाऱ्या कायदेशीर कारवाईमुळं. गुन्हा म्हटलं, की शिक्षा, पोलीस, न्यायालयाच्या फेऱ्या आणि आरोपीला ताब्यात घेण्यासाठीचे यंत्रणेचे प्रयत्न हा सारा क्रम आलाच. पण, कधी अशा प्रकरणाविषयी ऐकलं आहे का, ज्यामध्ये आरोपीला तब्बल चार दशकांनंतर अटक होते आणि त्याला आपण नेमकं काय गुन्हा केला होता याचाच विसर पडतो?

एखाद्या गुन्ह्याची नोंद पोलिसांत झाल्यानंतर तातडीनं पोलीस आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात करतात. मात्र काही आरोपी सापडता सापडत नाहीत. असाच एक आरोपी गेली कैक वर्षं पोलिसांना चकवा देत





होता. अखेर असंख्य मार्गांनी शोध घेतल्यानंतर आणि तब्बल ४८ वर्षांचा काळ उलटल्यानंतर हा आरोपी पोलिच्या जाळ्यात सापडला. बरं, दरम्यानचा काळ इतका मोठा होता, की या आरोपीला आपण नेमका काय गुन्हा केला हेच आठवेना.

### महिलेच्या हत्येचा प्रयत्न...

वयाच्या २३ व्या वर्षी चंद्रशेखर मधुकर कालेकर नावाच्या आकोपीनं 1977 मध्ये एका महिलेवर चाकूनं हल्ला केला होता. या हल्ल्यात महिला जखमी झाली होती. सदर प्रकरणाची नोंद कुलाबा पोलीस ठाण्यात करण्यात आली. ज्यानंतर भारतीय दंडसंविधानातील कलम ३०७ अन्वये आरोपीवर हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा नोंदवण्यात आला मात्र चंद्रशेखर तरीही पोलिसांच्या ताब्यात आला नव्हता. आरोपी वास्तव्यास असणारी चाळही काही वर्षांपूर्वी पाडली. पुढं तो मुक्कामासाठी सांताक्रुज, गोरेगाव, माहीम, लालबाग, बदलापूर अशी ठिकाणं बदलत राहिला. पोलिसांना चकवा देणाऱ्या या आरोपीला सत्र यानं फरार घोषित केलं आणि गुन्हा प्रलंबितच राहिला. आता मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर मागील ६ महिन्यांपासून आरोपीचा शोध घेण्याला पुन्हा वेग आला. कुलाबा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधाकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन तावरे पोलीस हवालदार कुलकर्णी, वैरागर, इंगवले यांच्या पथकानं थेट निवडणूक आयोगाचं संकेतस्थळ, आरटीओ अशा एक ना अनेक मार्गांनी त्याचा शोध घेत अखेर हा आरोपी कोकणात असणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील करंजणी गावात रहात होता ही बाब उघड झाली.

# अमेरिकेत पीएचडी, मुंबईतील हॉटेलमध्ये येऊन थेट लैगिंक अत्याचार, वरिष्ठ अधिकाऱ्याचा लेक गोत्यात





**■मुंबई। प्रतिनिधी,**

अमेरिकेत पीएचडी करणाऱ्या २९ वर्षीय मुलीने बलात्काराचा गुन्हा मुंबईतील वांद्रे पोलिस ठाण्यात दाखल केला. यासोबतच तिने काही धक्कादायक अशी गंभीर आरोप केली. तिने हा गुन्हा ३१ वर्षीय तिचा सहकारी असलेल्या मुलाविरोधात दाखल केला. वांद्रयातील आलिशान हॉटेलमध्ये बोलावून आपल्यावर बलात्कार करण्यात आल्याचे तिने आपल्या तक्रारीत म्हटले. ज्या मुलावर गुन्हा दाखल झाला तो देखील अमेरिकेत पीएचडी करतो. मुलीने तिच्या

मुंबईतील वांद्रा भागातील एका हॉटेलमध्ये खळबळ उडवणारा प्रकार घडला. ज्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. अमेरिकेत पीएचडी केलेल्या मुलाचा कारनामा पुढे आला असून बलात्काराची तक्रार दाखल करण्यात आलीये.

तक्रारीत म्हटले की, लग्नाचे आमिष दाखवून पीएडी संशोधक मुलगा तिच्यावर बलात्कार करत असे. मुलाने तिला जीवे मारण्याची धमकी देखील दिली. याबाबत पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

अमेरिकेत पीएचडी भारतात येऊन कारनामा

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेत पीएचडी करणा[illegible]या मुलाने मुलीला अभ्यासासाठी एका हॉटेलमध्ये बोलावले होते. यादरम्यान तो मुलीसोबत चुकीचा वागला. आरोपी हा मुंबईतील लोअर परेल भागात राहतो तर मुलगी माहिम भागात. आरोपीचे वडील एका मोठ्या बँकेत वरिष्ठ पदावर असल्याची माहिती मिळतंय. मुलीने पोलिसात तक्रार दिल्यानंतर हे सर्व प्रकरण उघडकीस आले.

जेव्हा तिने याबद्दल त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने तिच्यावर हल्ला करत धमकावले. हेच नाही तर खासगी फोटो लीक करण्याची धमकी देखील दिली. शेवटी निराश झालेल्या मुलीने सर्वप्रकार आपल्या आईला सांगितला आणि मुलगी थेट आईसोबत तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात पोहोचली. आरोपीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिस या प्रकरणात अधिकचा तपास करत आहेत. मात्र, या घटनेनंतर मोठी खळबळ उडालीये. दोघे अमेरिकेत देखील कायमच भेटत असल्याचाही खुलासा झाला आहे.

### मुलीने घेतली आईसोबत पोलिस ठाण्यात धाव

एफआयआरनुसार, ही बलात्काराची घटना 1 जानेवारी ते 12 जून दरम्यान वांद्रेतील हॉटेलमध्ये घडली. हेच नाही तर दोघे अमेरिकेत राहत असतानाही आरोपीने मुलीचे लैगिंक शोषण केले. आरोपी इलिनॉय विद्यापीठातून अबार्ना-चॅम्पेन पीएचडी करत आहे. दोघांची ओळख झाली आणि अभ्यासाबद्दल त्यांची चर्चा होत. काही दिवसांपूर्वी पीडित मुलीला समजले की, आरोपी दुस [illegible]या मुलीसोबत लग्नाबद्दल बोलत आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मुख्यमंत्री बोलले म्हणून...



**मुख्यमंत्री एखाद्या विषयात लक्ष घालत आहेत असे म्हटले की, सरकारी यंत्रणा झपाटून कामाला लागते. अगडळीत पडलेले नियम, कायदे व त्यातील तरतुदी याची उजळणी सुरू होते. सहकार क्षेत्राला शिस्त लागली, तर ग्रामीण अर्थकारणावर अनुकूल परिणाम होईल.**

महाराष्ट्राच्या ३२-३३ जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके वाया गेली व अनेक लोक आपत्तीग्रस्त झाले. त्यांना मदत करण्यासाठी निधी उभारणे हे फार मोठे आव्हानात्मक काम आहे. याचे कारण राज्याच्या तिजोरीवरील लोकप्रिय योजनांचा प्रचंड भार हे आहे. निधी उभारण्यासाठी सरकारसमोर काही मर्यादित पर्याय असतात. त्यापैकी एक होता साखर कारखान्यांत गाळपासाठी आलेल्या उसावर प्रत्येक टनामागे काही कपात करणे. एरवी मुख्यमंत्री निधीसाठी प्रतिटन १० रुपये कापले जातात. त्यात अतिवृष्टी बाधितांसाठी मदत म्हणून पाच रुपए वाढ केली गेली. राज्यातील साधारणपणे १३.५ लक्ष हेक्टर जमिनीवर ऊस घेतला जातो. कारखान्यांची संख्या २०० पेक्षा जास्त आहे. मागे ८५४ मे. टन उसाचे गाळप झाले आहे. पण पाच रुपए जास्त कशाला कापता, असा नकारात्मक सूर उमटला. शेतकऱ्यांच्या नेत्यांकडूनही प्रतिकूल मते व्यक्त होऊ लागली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रत्युत्तर देते झाले. त्यावेळी त्यांनी एक महत्त्वाचे वाक्य उच्चारले आणि त्याचा योग्य तो संदेश संबंधितांपर्यंत पोहोचला आहे. ही खरी मजेशीर बाब आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत शिर्डी येथील एका कार्यक्रमात फडणवीस म्हणाले की, कारखाने वजनात कसा काटा मारतात याची माज्याकडे माहिती आहे. हा कारखानदारांसाठी सूचक इशारा होता. असे म्हणतात की, त्यानंतर मुख्यमंत्री मदत निधीसाठी धनादेश घेऊन साखर कारखानदारांची रांग लागली. म्हणजे आधी कुरकूर करणारे कारखानदार एका रांगेत आले. विषय इथे संपत नाही. साखर कारखान्यांचा चालू वषार्चा गाळप हंगाम येत्या १ नोव्हेंबर रोजी सुरू होत आहे. कारखान्यांचे वजनकाटे तपासण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर भरारी पथकांची स्थापना करावी, अशा सूचना साखर आयुक्तांनी दिल्या आहेत. अशा सूचना नेहमीच दिल्या जातात, पण त्याकडे किती गांभीयार्ने पाहिले जाते, याची चर्चाही कधी होत नाही. अशा पथकात साखर कारखानदार, वजनेमापे विभाग व सहकार विभागाचे सहनिबंधक यांचे प्रतिनिधी असतात. जिल्हाधिकारी स्वतः किती ठिकाणी जातात याची कल्पना नाही, पण त्यांच्यावतीने प्रतिनिधीच जात असावा. त्यांच्या तपासणीची किती जरब कारखानदारांमध्ये आहे हे माहिती नाही. पण कष्टाने पिकविलेल्या उसाचे वजन केले जात असताना त्या शेतकऱ्याला तिथे उभा राहू न देण्याची 'खबरदारी' अनेक कारखाने घेतात, ही वस्तुस्थिती आहे. साधी भाजी विकत घेतली तर ग्राहक वजनकाट्याकडे पाहत असतो. कमीजास्त दिसले तर वाद घालतो. पण आपला ऊस मोजला जात असताना शेतकरी तिथे उभा राहू शकत नाही. त्याचे ट्रॅक्टर किंवा बैलगाडी आत नेली जाते, कसे वजन केले जाते ते आतल्या लोकांनाच माहिती असते. आणि शेतकरी मात्र बाहेर उभा राहून इलेक्ट्रॉनिक बोर्डवर आकडा पाहतो. डिजिटल वजनकाटे बसवा, अशी मागणी होत असली तरी त्याकडे अनेकांनी कानाडोळा केला आहे. मुख्यमंत्री जाहीरपणे बोलल्याने वजनकाटा पद्धतीत बदल होणार आहे का, हा खरा मुद्दा आहे. जिल्हाधिकारी हे जिल्हा निबंधक असतात. ते नेमके कधी निबंधक म्हणून काम करतात, हा एक मोठा प्रश्नच आहे. समजा एखादा ऊस उत्पादक नियमितपणे एखाद्या कारख्यान्याला ऊस देत असेल, तरी तो त्या कारखान्याचा भागधारक असेलच असे नाही. एखाद्याने जिल्हा निबंधक म्हणजे जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागितली व त्यावर सुनावणी घेऊन त्या शेतकऱ्याला कारखान्याचा भागधारक म्हणून स्वीकारण्याचे आदेश त्यांनी दिलेत, असे किती प्रसंग महाराष्ट्रात घडले असतील हे कोडेच आहे. सरकार चालवणारेच सहकार क्षेत्रातील मातब्बर असल्याने जिल्हाधिकाऱ्यांना मोकळीक मिळाली नाही. पण आता राजकारण बदलले असले, तरी परिस्थिती बदलल्याचे दिसत नाही. जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या क्षेत्रातील सहकारी संस्थांमधील गैरप्रकारात लक्ष घालण्यास मोकळीक दिली असती, तर लक्षावधी भागधारकांवर मेहरबानी झाली असती व ग्रामीण अर्थकारण टिकले असते. असो. महाराष्ट्राचे राजकारणच ऊस या पिकाभोवती अनेक दशके फिरले. एखादा कारखाना एखाद्या तालुक्याचेच नव्हे. तर दोन -तीन विधानसभा मतदारसंघाचे राजकीय गणित बदलू शकतो. म्हणून राज्यात बेसुमार सहकारी साखर कारखाने निघाले. त्यात सरकारची गुंतवणूक असते. सहकारी बँका कर्ज देतात. जमीन, पाणी सरकारचेच. पण कारखानदार मालक झाले. बरीच मंडळी यातून मातब्बर झाली. ज्यांना हे सगळे उत्तम रितीने जमले त्यांच्या घरातच दोन-दोन आमदार, खासदार, मंत्री झाले. त्यांनी चॅरिटेबल ट्रस्ट काढून शिक्षणसंस्थांचे जाळे विणले. ज्यांना कारखाने चालवता आले नाहीत ते राजकारणात गॉडफादरमुळे टिकले, पण सहकारी कारखाने विकले गेले. त्यातल्या काहींनी तेच कारखाने लिलावात विकत घेतले व नवा पॅटर्न निर्माण केला. यात नैतिकतेचा भाग किती याची धुलाई राजकारणाच्या दगडावर होत नाही. त्यामुळे सत्तेला आवडणाऱ्यांची कसलीच चौकशी झाली नाही किंवा सुरू असलेली चौकशीही थांबली. सरकारच्या तिजोरीला मोठा फटका मात्र बसला. आधी कारखाना उभा करायला पैसे देणारे सरकार पुन्हा कारखाना बुडाला म्हणून राज्य सहकारी बँकेला कर्जाच्या हमीपोटी त्याची परतफेड करू लागले. या दुहेरी फेडीमुळे महाराष्ट्राच्या जनतेचा किती पैसा वाया गेलाय याची चर्चा जगाच्या गप्पा मारणारे तथाकथित विद्वान करत नाहीत. सहकारावर प्रवचन देणाऱ्या बऱ्याच लोकांनी खासगी कारखाने काढले. सहकारी कारखाना न चालवता येणारे खासगीत सुशेगाद आहेत. कारण तिथे भागधारक मोजकेच आणि कारखाना मात्र मालकी हक्काची कंपनी आहे. गरजवंत आहे तो ऊस उत्पादक. त्याला ब्र काढण्याची परवानगी नाही. साखर कारखानदारीमुळे बुडालेली राज्य सहकारी बँक प्रशासक नेमल्यानंतर मात्र गेली १०-१५ वर्षे उत्तम चालते आहे. तिथे लोकशाहीत अभिप्रेत असलेली निवडणूक मात्र नको आहे. कारण प्रशासक सरकारनियुक्त आहेत. ते सरकारच्या आदेशाबाहेर जाऊ शकत नाहीत. आम्हालाच सहकारातले फार कळते म्हणून उपदेशाचे डोस देणारे सगळे गप्प आहेत. बाकी भाजपने डोळे वटारल्याबरोबर बरेच साखर कारखानदार पटकन सत्तापक्षाच्या वळचणीला जाऊन बसले. जे बाहेर राहीले आहेत, त्यातील बरेचजण सत्तापक्षाच्या हुकमाचे ताबेदार आहेत. असे चित्र असले तरी मुख्यमंत्री वजनकाट्याबाबत बोलले आणि विषय ऐरणीवर तरी आला. या हंगामात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील किती भरारी पथके वजनकाट्यातील मापात पाप शोधतात आणि शेतकऱ्यांना दिलासा देतात यासाठी काही काळ प्रतीक्षा करावी लागेल. मुख्यमंत्री लक्ष घालत आहेत असे म्हटले की, सरकारी यंत्रणा झपाटून कामाला लागते. अगडळीत पडलेले नियम, कायदे व त्यातील तरतुदी यांची उजळणी सुरू होते. सहकार क्षेत्राला शिस्त लागली, तर ग्रामीण अर्थकारणावर अनुकूल परिणाम होईल आणि सरकारचा भार कमी होईल. अनेक सहकारी संस्था अडचणीत आहेत किंवा आणल्या गेल्या आहेत. गेल्या १०-१५ वर्षांत किती सहकारी संस्थांची चौकशी सुरू झाली आणि ती मध्येच थांबली व चौकशी झाल्यानंतरही चुकीच्या लोकांवर कारवाई झाली नाही याची यादी खूप मोठी आहे. त्यात लक्ष घालून काहींवर जरब बसविणारी कारवाई झाली तरी या क्षेत्रात अनेक गोष्टी मार्गी लागतील व त्याचा चांगला परिणाम झालेला दिसेल.

# ई-कॉमर्स कंपन्यांची सूट अन् ग्राहकांची छुपी लूट!

**दिवाळीच्या निमित्ताने सर्व ई-कॉमर्स कंपन्या २० टक्क्यांपासून ते ७० टक्क्यांपर्यंत सवलतीच्या आकर्षक ऑफर्स ग्राहकांना देत सुटल्यात. ग्राहकही या ऑफर्सचा लाभ घ्यायला ई-कॉमर्स साईट्सवर अक्षरशः तुटून पडलेत. पण, या सवलतीच्या लाटेत असेही अनेक ग्राहक आहेत, ज्यांना डिस्प्ले झालेल्या अर्थात दाखवलेल्या ऑफर्सपेक्षा अधिकचं पेमेंट करावं लागल्यानं ते सध्या चक्रावून गेलेत. डिलिव्हरी फी, प्लॅटफॉर्म फी एवढंच नाही तर पेमेंट-ऑफर हँडलिंग फीच्या नावाखाली छुपे पैसे उकळलेत. ग्राहकांना मिळालेल्या ऑफर्सचा काही फायदाच झालेला नाही. ऐन सणासुदीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या खिसा कापला गेल्यानं हे ग्राहक चांगलेच वैतागलेत.**

दीपोत्सवाचं स्वागत करायला देशभरातील बाजारपेठा नटूनथटून तयार झाल्यात. खरेदीदारांच्या वाढत्या गर्दीसोबतच बाजारपेठांमध्ये नवचैतन्य संचारू लागलंय. एका बाजूला किरकोळ बाजारपेठा सणासुदीची संधी इन्कॅश करत असतानाच ऑनलाईन बाजारपेठेतली चकमही वाढलीय. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिंत्रा, अजीयो, टाटा क्लिक, मिशो, ब्लिंकइट आदी ई-कॉमर्स शॉपिंग पोर्टल्स ग्राहकांना दिवाळी उत्सवाच्या निमित्तानं प्रचंड सवलती देऊ लागलेत. कुठं ग्रेट इंडियन फेस्टिव्हल, बिग बिलीयन डेज, तर कुठं दिवाळी सेल सुरू आहे. यामध्ये स्मार्टफोन, लॅपटॉप, इयरबड्स, होम अप्लायन्सेस, इतर इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स, फॅशनेबल ॲपेरल्स, शूज, बॅग्ज, गृहसजावटीच्या वस्तू, भेटवस्तूंवर भरघोस सवलतींचा वर्षाव सुरू आहे. या सर्व ई-कॉमर्स कंपन्या २० टक्क्यांपासून ते ७० टक्क्यांपर्यंत सवलतीच्या आकर्षक ऑफर्स ग्राहकांना देत सुटल्यात. ग्राहकही या ऑफर्सचा लाभ घ्यायला ई-कॉमर्स साईट्सवर अक्षरशः तुटून पडलेत.

पण, या सवलतीच्या लाटेत असेही अनेक ग्राहक आहेत, ज्यांना डिस्प्ले झालेल्या अर्थात दाखवलेल्या ऑफर्सपेक्षा अधिकचं पेमेंट करावं लागल्यानं ते सध्या चक्रावून गेलेत. डिलिव्हरी फी, प्लॅटफॉर्म फी एवढंच नाही तर पेमेंट-ऑफर हँडलिंग फीच्या नावाखाली त्यांच्याकडून या ई-कॉमर्स साईट्सनी थोडे थोडे करत इतके छुपे पैसे उकळलेत की या ग्राहकांना मिळालेल्या ऑफर्सचा काही फायदाच झालेला नाही. ऐन सणासुदीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या खिसा कापला गेल्यानं हे ग्राहक चांगलेच वैतागलेत. अशा फसवणूक झालेल्या ग्राहकांच्या तक्रारींनी सोशल मीडिया साईट्सच्या वॉल्स मागच्या महिनाभरात भरून गेल्यात. इतक्या की केंद्रीय ग्राहक व्यवहारमंत्री प्रल्हाद जोशी यांना या तक्रारींची दखल घेत ई-कॉमर्स कंपन्यांना दम द्यावा लागलाय.

त्याचं झालं असं की, एका ग्राहकानं फ्लिपकार्टवरून खरेदी केलेल्या वस्तूच्या बिलाचा स्क्रीनशॉटच सोशल मीडियावर पोस्ट करून या विचित्र चार्जेसवर प्रश्न उपस्थित केले. मग काय, एका झटक्यात हा स्क्रीनशॉट आणि ई-कॉमर्स कंपन्यांच्या छुप्या लुटीचं प्रकरण व्हायरल झालं. या ग्राहकानं खरेदी केलेल्या वस्तूच्या किमतीसह कंपनीनं त्यात अनेक विचित्र चार्जेस अतिरिक्त जोडले होते. हे प्रत्येक चार्जेस ५० रुपयांपासून ते १०० रुपयांपर्यंतचे होते. अशा रितीनं या ग्राहकाचे २०० ते ३०० रुपये अधिकचे कापले गेले. स्विगी, झोमॅटो, झेप्टो फूड डिलिव्हरी करणाया प्लॅटफॉर्मची पावसाळ्यातली एक्स्ट्रा रेन फी तुम्ही विसरूनच जा. कारण, फ्लिपकार्टनं सणासुदीत ग्राहकांना ठकवण्यात मास्टरस्ट्रोक मारल्याचा आरोप सिदनान नावाच्या या





ग्राहकानं केला. जी ऑफर तुम्ही मला दाखवली, त्याचा पैसा ऑफर हँडलिंग फीच्या नावानं माज्याकडूनच घेता? मी तुम्हाला जे पैसे देतोय त्यावर माझ्याकडूनच पेमेंट हँडलिंग फी घेताय? प्रोटेक्ट प्रॉमिस फी म्हणजे नेमकं तुम्ही मला कशापासून वाचवताय? ऑफर मिळाल्याच्या समाधानापासून? आता पुढची फी स्क्रोलिंग फी म्हणून घेणार का? असे प्रश्न या ग्राहकानं उपस्थित केले. ही पोस्ट व्हायरल होताच केंद्रीय ग्राहक संरक्षणमंत्री प्रल्हाद जोशींनी या प्रकरणाची सूत्रं हाती घेतली. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म कॅश ऑन डिलिव्हरीसाठी जास्त शुल्क आकारत असल्याच्या अनेक तक्रारी ग्राहक व्यवहार विभागापर्यंत पोहोचल्या आहेत. ग्राहकांची दिशाभूल करणारा व त्यांचं शोषण करणारा हा एक डार्क पॅटर्न आहे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली असून या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मची बारकाईनं तपासणी सुरू आहे. भारतात वाढत्या ई-कॉमर्स क्षेत्रातली पारदर्शकता आणि निष्पक्ष व्यवहार सुनिश्चित करण्यासाठी ग्राहकांच्या अधिकारांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असं आश्वासन या पोस्टला रिप्लाय करताना प्रल्हाद जोशींनी दिलं.

प्रल्हाद जोशींच्या प्रतिक्रियेत त्यांनी जो डार्क पॅटर्न हा शब्द वापरलाय, तो खूपच महत्त्वाचा आहे. हा डार्क पॅटर्न नेमका काय आहे हे ई-कॉमर्सवरून खरेदी करणार्यांनी समजून घेतलं पाहिजे. या ई-कॉमर्स कंपन्या अनेक भ्रामक शब्दांचा वापर करून किंवा विविध पॅटर्न वापरून ग्राहकांची दिशाभूल करत असतात. ज्याला डॉर्क पॅटर्न असं म्हणतात. उदा. वस्तूची संख्या कमी दाखवणं-स्टॉकमध्ये शेवटच्या २ किंवा ५ वस्तूच शिल्लक असल्याचं डिस्प्लेला दाखवणं. प्रत्यक्षात या वस्तूंनी गोदामं भरून पडलेली असतात. फेक डेडलाईन-अमूक-तमूक ऑफर पुढचे फक्त १० मिनिटंच चालेल असं सांगितलं जातं. प्रत्यक्षात ही ऑफर पुढचे १० तास उलटून गेले तरी सुरूच असते. वस्तूंच्या किमती आधीच वाढवून नंतर त्यात २० टक्क्यांपासून ७० टक्क्यांपर्यंतच्या ऑफर्स दाखवल्या असतात, केवळ ऑफर्सच्या टक्केवारीला भुलून ग्राहक वस्तू विकत घेतो, तेव्हा ती त्याला मूळ किमतीलाच मिळालेली असते. अनेकदा ऑर्डर प्लेस होऊन डिलिव्हरीला निघाल्यानंतर ती अचानक मध्येच गायब होते.

डिलिव्हरीची वेळ, दिवस बदलतो किंवा डिलिव्हरीच कॅन्सल केली जाते. अनेकांनी फ्लिपकार्टवर ॲडव्हान्स पैसे भरूनही त्यांना डिलिव्हरी न मिळाल्याच्या तक्रारी आहेत. परत देत असलेले पैसे नको ऑफर केलेली वस्तूच द्या, असा धोशाही अनेक ग्राहकांनी या कंपन्यांच्या मागं लावल्याचं कळतं. त्यातही हँडलिंग फी वगैरे भ्रामक शब्दांचा वापर करून केलेली लूट तर आणखीनच भयानक. डार्क पॅटर्नप्रमाणेच हे एक्स्ट्रा चार्जेस ई-कॉमर्स कंपन्या आपल्याकडून कुठल्या स्वरुपात वसूल करतात, हे चार्जेस टाळण्यासाठी आपल्याला काय करता येईल, यासाठी त्यांचीही माहिती असायला हवी. यामध्ये प्रामुख्यानं सिक्युर पॅकेजिंग फी, रिटर्न फी, कॅन्सलेशन फी, कॅश ऑन हँडलिंग फी, फर्स्ट टाइम सेल फी, ऑफर हँडलिंग फी या ६ प्रमुख हिडन चार्जेसचा समावेश असतो. ते आपण एक एक करून समजून घेऊयात.

१.**सिक्युर पॅकेजिंग –** समजा तुम्ही एखादा स्मार्टफोन कुठल्या ई-कॉमर्स साईटवरून ऑर्डर केलाय, तर त्या स्मार्टफोनच्या बॉक्सवर ब्रँडच्या सीलसोबतच ई-कॉमर्स कंपनीचाही एक्स्ट्रा सील लागलेला असेल. जेणेकरून तो बॉक्स कुणी उघडणार नाही किंवा सील तोडण्याचा प्रयत्न केल्यास लक्षात येईल. यासाठी ३० ते १०० रुपयांपर्यंत अतिरिक्त चार्जेस घेतले जातात.

२.**रिटर्न फी –** तुम्ही एखादी वस्तू खरेदी केल्यानंतर वारंवार परत करत असाल तर त्यासाठी तुम्हाला २५ ते ७५ रुपयांपर्यंत हे चार्जेस भरावे लागतात. त्याऐवजी तुम्ही एक्सेंजेंच्या पयार्यावर क्लिक करून एखाद्या शर्टची साईज बदलून घ्यायची असेल किंवा रंग बदलायचा असेल तर तसे करून पैसे वाचवू शकता.

३.**कॅन्सलेशन फी–**ग्राहकांनी वस्तू ऑर्डर केल्यानंतर २४ तासांत ऑर्डर कॅन्सल केल्यास हा चार्ज लागत नाही. परंतु २४ तासानंतर ऑर्डर कॅन्सल केल्यावर हे कॅन्सल चार्जेस भरावे लागतात. कारण अनेकदा सेलरकडून वस्तू पॅक केलेली असते, पुढे ती शिपिंग म्हणजेच डिलिव्हरीसाठी पाठवली जाते, ऑर्डर कॅन्सल केल्यावर जो खर्च वाया जातो तो ग्राहकाकडून वसूल केला जातो. हे तीन चार्जेस तसे जुनेच असून ऑनलाईन शॉपिंग करणाया बयाच ग्राहकांना ते माहीत आहेत. यापुढचे चार्जेस नव्यानं ॲड झालेले आहेत. त्यात

४.**कॅश ऑन डिलिव्हरी हँडलिंग फी –** म्हणजे अनेकदा ग्राहक ऑर्डर केल्यानंतर कॅन्सल-रिटर्न करतात किंवा वस्तू स्वीकारत नाही, यावेळी होणारं नुकसान टाळण्यासाठी हे चार्जेस घेतले जातात. ग्राहकांनी कॅशऐवजी ऑनलाईन पेमेंटकडं वळावं आणि वस्तू खरेदी करताना त्याच्याकडून सर्व पेमेंट तेव्हाच मिळावं हा कंपन्यांचा त्यामागचा उद्देश.

५.**फर्स्ट टाईम सेल फी –** पहिल्यांदाच सेलमधून वस्तू विकत घेणाऱ्यांकडून ही फी घेतली जाते.

६.**ऑफर हँडलिंग फी –** एखादी वस्तू तुम्ही डेबिट-क्रेडिट कार्डच्या ऑफरमध्ये खरेदी करत असाल तर त्यावरही फी घेतली जाते.

या तिन्ही प्रकारांत प्रत्येकी १० रुपयांपासून १०० रुपयांपर्यंत फी घेतली जाते. या तिन्ही हिडन चार्जेसवर ग्राहकांचा कमालीचा रोष आहे. ऑफर्सच्या नावाखाली करण्यात येणारी ही छुपी लूट असल्याचं ग्राहकांचं म्हणणं आहे. ऑनलाईन खरेदीकडं नव्या जमान्यातील ग्राहकांचा कल असल्यानं हे ग्राहक सणासुदीच्या ऑफर्समध्ये काही हजार किंवा लाख रुपयांच्या वस्तू ऑनलाईन खरेदी करतात. एका ग्राहकाकडून १०० रुपये जरी मिळाले तरी लाखो ग्राहकांच्या माध्यमातून या ई-कॉमर्स कंपन्या कोट्यवधी रुपये या हिडन चार्जेसमधून कमावतात. बरेचसे ग्राहक आता या ऑनलाईन खिसेकापूंबाबत अलर्ट झालेत. परंतु असंख्य ग्राहक असेही आहेत, ज्यांना या हिडन चार्जेसची जराही कल्पना नाही. ई-कॉमर्स कंपन्यांकडून होणारी ही छुपी लूट थांबवण्यासाठी ग्राहक संरक्षण मंत्रालय नेमक्या कशा रितीनं कारवाई करेल किंवा या कंपन्या कारवाईपासून वाचण्यासाठी इतर काही आयडिया लढवतील का? हे बघणं महत्त्वाचं ठरणार आहे. ई-कॉमर्स कंपन्याकडून मिळणारी सूट आपल्या पैशांच्या लुटीचं कारण बनता कामा नये, यासाठी ग्राहकांनी दक्ष राहायला

## आत्मसंयमयोग

माउली म्हणतात, 'मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण। करुनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे।।' सहाव्या अध्यायाच्या सुरुवातीला भगवंत कर्मसंन्यास आणि कर्मयोग या विषयीची चर्चा करताना म्हणतात, जो कर्मफलाच्या ठिकाणी अनाश्रय धरून राहतो, तोच संन्यासी आणि तोच योगी होय. संकल्पाचा त्याग घडल्याशिवाय योगी आणि संन्यासीही होता येणार नाही. कर्मयोग सिद्ध होण्यासाठी लागणारी समबुद्धी संपादन करण्यासाठी भगवंत आत्मसंयमन, म्हणजे ध्यानाचा अभ्यास सांगतात. ध्यानाला बसण्याचे ठिकाण संतांनी वसविलेले स्थान अथवा आपल्या घरात देव्हाऱ्यासमोर अथवा सद्गुरूंच्या प्रतिमेसमोर असावे. आसन साधे; पण स्वच्छ असावे. सतरंजी अथवा घोंगडी, त्यावर धूतवस्त्राची घडी चालेल. त्या आसनाचा उपयोग शक्यतो ध्यानाखेरीज अन्य कशासाठी शक्यतो केला जाऊ नये. ध्यानासाठी निश्चित केलेली वेळ कायम राखावी. प्रथम सद्गुरूंचे स्मरण करावे; त्यांची मानसपूजा करावी. बसताना डोके, मान, पाठीचा कणा व कंबर सरळ रेषेत असावीत. माउली म्हणतात, 'तैसे स्मरतेनि आदरे। सबाह्य सात्त्विके भरे। जव काठिण्य विरे। अहंभावाचे।।' डोळे पूर्ण वेळ मिटलेले असावेत. पाठोपाठ साधक ब्रह्मभावाला प्राप्त होतो. प्रगाढ शांती अनुभवतो. माउली म्हणतात, 'जेथ पुढील पैस पारुखे। मागील स्मरावे ते ठाके। ऐसिये सरिसीये भूमिके। समाधी राहे।।' पहिला विचार संपलेला आहे आणि पुढचा विचार उठायचा आहे, यात काही अंतर असते. हे निर्विचार अवस्थेचे क्षण हळूहळू वाढत जाऊन साधकाला क्षणक्षण शांतीचा अनुभव येतो. त्याला 'धारणा' असे म्हणतात. ही निर्विचार अवस्था दीर्घ काळ टिकली, की त्याला 'ध्यान' असे म्हणतात. पुढे त्याचीच परिणती समाधी अवस्थेत होते. समाधी म्हणजे संपूर्ण चित्तरहित आत्मस्थिती. स्वामी माधवनाथ म्हणतात, 'निवांत राही ज्योत दिव्याची, तैसे मानस झाले। गुरुकृपेने निर्मळ होऊनी शांत तेवत राहिले।।' अशी शांती अनुभवलेला साधक व्यवहारातही शांती, समाधान आणि आत्यंतिक सुखाचा अनुभव घेतो. ही अवस्था टिकण्यासाठी मनाबरोबर सर्व इंद्रियांना सर्व बाजूंनी उत्तम आवरून धरणे आवश्यक आहे. पुढे त्याला व्यापक आत्मभावाची प्राप्ती कशी होते, ते पुढील लेखात पाहू. स्वामी मकरंदनाथ म्हणतात, 'निजसुखी रमुनी गेलो ध्यानी, सारूनी देहमनास।'

# आरटीई प्रवेशात पालकांची कोंडी

**आरटीईमुळे गरीब मुलांना आठवीपर्यंत मोफत शिक्षण मिळते, पण नववीचे प्रवेश शुल्क (₹. १.५ ते दोन लाख) ऐकून पालकांना मोठा धक्का बसतो. या गंभीर समस्येवर त्वरित तोडगा काढण्यासाठी सरकारने पाऊल उचलणे गरजेचे आहे.**

शिक्षण हक्क कायद्यामुळे (आरटीई) पहिली ते आठवीपर्यंतच्या मुलांना मोफत शिक्षणाची संधी मिळाली आहे. मात्र, जेव्हा नववीच्या वर्गाचे शुल्क समोर येते, तेव्हा पालकांना भोवळ आल्यासारखं होतं. चांगल्या दर्जाचे शिक्षण देणाऱ्या शाळा पालकांकडून एका वर्षाचे दोन ते तीन लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारत आहेत. यामुळे गरीब पालकांची मोठी आर्थिक कोंडी होत आहे.

केंद्र सरकारने २००९ मध्ये हा शिक्षण हक्क कायदा (आरटीई) आणला, जो १ एप्रिल २०१० पासून देशभरात लागू झाला. या कायद्यामुळे सहा ते १४ वयोगटातील, म्हणजेच पहिली ते आठवीपर्यंतच्या गरीब आणि वंचित मुलांना उत्कृष्ट दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळवण्याचा हक्क मिळाला. आरटीई प्रवेशासाठी शाळांमध्ये २५ टक्के जागा आरक्षित ठेवल्या जातात, ज्यामुळे गरीब घटकांतील विद्यार्थ्यांना राज्य मंडळ, आयसीएसई आणि सीबीएसई मंडळांच्या शाळांमध्ये प्रवेश मिळतो. मात्र, अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या अनुदानित किंवा विनाअनुदानित शाळा आरटीई कायद्याची अंमलबजावणी करत नसल्यामुळे, राज्यातील लाखो मुलांना चांगल्या शाळांमधील प्रवेशापासून वंचित राहावे लागत आहे.

राज्यात आरटीई प्रवेशासाठी दरवर्षी तीन लाखांहून अधिक विद्यार्थी अर्ज करतात. पण राज्यात केवळ एक लाख जागा उपलब्ध असल्याने, जवळपास दोन लाख मुलांना दर्जेदार शिक्षणाच्या लाभापासून मुकावे लागत आहे.

आरटीईनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण देणे बंधनकारक आहे. या विद्यार्थ्यांचे शुल्क शिक्षण विभाग भरते. मात्र, हे अनुदान शाळांना वेळेवर मिळत नसल्यामुळे शाळा पालकांना वेठीस धरतात आणि त्यांच्याकडून शुल्काची मागणी करतात. पहिली ते आठवी मोफत असल्याने पालक आपल्या मुलांना आरटीईतून प्रवेश घेतात. पण, आठवीचे वर्ष संपण्यापूर्वीच शाळा पालकांना सांगतात की, नववीच्या वगार्साठी शुल्क भरावे लागेल. हे शुल्क ऐकून पालकांचे डोळे पांढरे होतात. नववीतील प्रवेशासाठी शाळा दीड ते दोन लाख रुपये शुल्क भरण्यास सांगतात. त्यामुळे पालकांची झोप उडते. इतके शुल्क भरणे शक्य नसल्यामुळे, अखेरीस मुलांना जिल्हा परिषदेच्या किंवा महानगरपालिकेच्या शाळेत प्रवेश घेण्याची वेळ येते.





पहिली ते आठवीपर्यंत चांगल्या शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नववी आणि दहावीचे शिक्षण मात्र कठीण परिस्थितीत पूर्ण करावे लागते. नववीसाठी घराजवळ शाळा उपलब्ध नसेल, तर पालकांना कर्ज काढून मुलांना आहे त्या शाळेत शिकवावे लागते. किंवा मग, काही पालक मुलांचे शिक्षण थांबवण्याचा विचार करतात. यामुळे आरटीईतून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांसमोर नववी-दहावीच्या शिक्षणाचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. विशेष म्हणजे, पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण मिळत असल्यामुळे अनेक श्रीमंत लोकही कायद्याचा दुरुपयोग करून आपल्या मुलांना आरटीई प्रवेशातून प्रवेश मिळवतात. अशा पालकांवर शिक्षण विभागाने वेळेत कारवाई करणे गरजेचे आहे. आरटीई कायद्यांतर्गत सहा ते १४ वयोगटातील मुलांना मोफत प्रवेश मिळतो. पण कायद्यात शून्य ते १७ अशी तरतूद नसल्यामुळे ज्युनिअर-सीनिअर केजी, तसेच नववी-दहावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येतात. मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे, असे मत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

गेल्या काही वर्षांत राज्यातील अनुदानित शाळा मोठ्या प्रमाणात बंद पडू लागल्या आहेत, ही चिंतेची बाब आहे. याउलट, स्वयंअर्थसहाय्यित शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे प्राथमिक शिक्षण देण्याबाबत पालकांसमोर पेच निर्माण झाला आहे. यात गरीब मुले शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची भीती आहे. अनुदानित शाळा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने आणि पयार्याने पालकांनीही प्रयत्न करणे गरजेचे आहे. पालकच मुलांना विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश देत असल्याने अनुदानित शाळा बंद पडत आहेत, तर विनाअनुदानित शाळांना 'सुगीचे दिवस' आले आहेत. भविष्यात विद्यार्थ्यांअभावी अनुदानित शाळा बंद झाल्यास, गरीब मुलांचे शिक्षणाचे दरवाजे कायमचे बंद होऊ शकतात.

ज्युनिअर-सीनिअर केजीपासूनच शिक्षणासाठी पालकांना मोठा आर्थिक भार सोसावा लागतो. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षणासाठी तर लाखो रुपये खर्च येतो. त्यामुळे उच्च शिक्षण गरीब विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे आणि गरीब विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जात आहेत.

आरटीईनुसार सहा ते १४ वयोगटातील मुलांना मोफत प्रवेश मिळतो, पण नववी-दहावीच्या दोन वर्षांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. पालकांसमोरचा हा पेच शिक्षण विभागाने वेळेत सोडवणे आवश्यक आहे. त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची तेवढीच गरज आहे, अन्यथा आरटीईनुसार प्रवेश घेणाऱ्या पालकांची ही लूट कधीच थांबणार नाही.

# गाई-वासराच्या पूजेचे सोपे मंत्र आणि आरती

यंदा १७ ऑक्टोबर रोजी गोवत्स द्वादशी अर्थात वसुबारस साजरी केली जाईल. हिंदू धर्मात गायीला अत्यंत पवित्र मानले जाते. मान्यतेनुसार गाईमध्ये देवांचा वास असतो. त्यामुळे वसुबारस या दिवशी गाईची सेवा व पूजा केल्याने जीवनात मंगल होतं आणि अनेक लाभ मिळतात. गोवत्स द्वादशी हा सण दीपावली किंवा अमावस्येपूर्वी द्वादशी तिथीला साजरा केला जातो. गायी-वासरांची पूजा करण्याबरोबरच या दिवशी उपवास करण्याचीही परंपरा आहे. या दिवशी माता आपल्या मुलाच्या दीघार्युष्यासाठी हे व्रत करतात. मान्यतेनुसार या दिवशी गाय आणि वासराची पूजा केल्याने सर्व देवतांचा आशीर्वाद प्राप्त होतो.

**पूजा विधी**

- गाय आणि वासराला स्नान घालून स्वच्छ करावे.
- त्यांना हळद, कुंकू, गंध, फुले आणि अक्षता (तांदूळ) लावावे.
- गायीच्या पायांना हळद-कुंकू लावून नमस्कार करावा.
- गाय आणि वासराला गूळ, चारा, किंवा फळे अर्पण करावी.

क्षीरोदार्णवसम्भूते सुरासुरनमस्कृते। सर्वदेवमये मातगृर्हाणार्घ्य नमो नमः॥

मंत्र जपत गाईला आंघोळ करावी. वरील मंत्र म्हणत गायेची पूजा आणि प्रदक्षिणा करावी. शेवटी आरती करावी.'

**गाय-वासरू पूजेचे सोपे मंत्र**

- हा मंत्र गायेला नमस्कार करताना आणि पूजा करताना म्हणावा

ॐ सुरभ्यै नमः । ॐ गौमातायै नमः

- वासराला पूजताना हा मंत्र म्हणावा.

ॐ वत्साय नमः ।।

ॐ गौमातायै विश्वमातायै सर्वं विश्वेन संनादति।

सर्वं गवां तपोमयं गौमातरं नमाम्यहम्।



# वसुबारसला सुहासिनी महिलांनी काय करावे कोणते नियम पाळावेत?

सर्वांचा आवडता असा सण दिवाळी काही दिवसातच सुरु होणार आहे. प्रत्येक जण दिवाळीची आतुरतेने वाट पाहत असतो. तसेच दिवाळीची सुरवात कराष्टमी पासून होते. व कराष्टमी नंतर येते वसुबारस. वसुबारस हे व्रत मुख्यतः महिला ठेवत असतात. तसेच यादिवशी काही नियम आहे जे पाळल्याने घरात सुख आणि समृद्धी नांदते. वसुबारस दिवशी महिलांनी कोणते नियम पाळावे हे जाणून घ्या...

वसुबारस हा दिवस गाय आणि वासरूच्या पूजेचा असून, सौभाग्यवती महिलांसाठी विशेष महत्त्वाचा आहे. या व्रताद्वारे पतीच्या दीघार्युष्यासाठी आणि कौटुंबिक समृद्धीसाठी प्रार्थना केली जाते. तसेच सुहासिनी महिलांनी हे व्रत एकभुक्त म्हणजेच दिवसभरात फक्त एक वेळ जेवणकरून पाळावे.

**मुख्य नियम–**

**उपवास** – दिवसभर उपवास करून सायंकाळी किंवा रात्री एकच वेळ जेवण घ्यावे. जेवणात सात्विक पदार्थ घ्यावेत. दूध, दही किंवा गायीच्या उत्पादनांचा समावेश करावा, कारण हा गायीचा सण आहे.

**गाय आणि वासरूची पूजा** – सायंकाळी गायीची आणि वासरूची पूजा करावी. पूजेसाठी हळद, कुंकू, फुलें, धूप, दीप, नैवेद्य अर्पण करावे. पूजेनंतर गायीला अन्न दान करावे. मंत्रः ''ॐ गोमातायै नमः'' किंवा ''वसू देवी पूजयामि, पतीं लोङ्गायुषं कुरु'' असा जप करावा.

**वस्त्र** – पूजेसाठी स्वच्छ साडी घालावी. लाल वस्त्र टाळावीत. आंघोळ करून शुद्ध होऊन पूजा करावी. केस धुणे किंवा सौंदर्य प्रसाधने टाळावीत.

**घरापुढे रांगोळी** – घराच्या मुख्य दरवाजाजवळ रांगोळी काढावी. हे सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक आहे आणि समृद्धी आणते. घर स्वच्छ ठेवावे आणि दीपप्रज्वलन करावे.

**या गोष्टी टाळाव्या –**

- मांसाहार, मद्य ग्रहण करणे.
- क्रोध, चुकीची वाणी किंवा अपवित्र विचार टाळणे.
- मासिक पाळी असल्यास पूजा दुसऱ्याकडून करून घ्यावी, स्वतः स्पर्श न करणे.

**महत्त्व** – या व्रताने पतीला आरोग्य आणि कौटुंबिक सुख प्राप्त होते. तसेच गायीला मातृस्वरूप मानून तिची पूजा केल्याने धन-धान्य आणि संततीप्राप्ती होते, अशी श्रद्धा आहे.

**आश्विन कृष्ण द्वादशीस, म्हणजेच गोवत्स द्वादशीस, वसुबारस हा सण साजरा केला जातो. यंदाच्या वर्षी वसुबारस शुक्रवारी १७ ऑक्टोबर रोजी येणार आहे. गोवत्सद्वादशी म्हणजे गाई-गुरांबददल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. वसु म्हणजे द्रव्य अर्थात धन त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी म्हणून या दिवसाला गोवत्स द्वादशी असे म्हणतात.**



# वसुबारस या दिवशी काय करावे आणि काय टाळावे : शुभ-अशुभ गोष्टी

हिंदू धर्मात गाईला महत्वाचे स्थान असून तिचा सन्मान करण्याचा हा दिवस. या दिवशी गाईची पाडसासह पूजा करतात. समुद्र मंथनातून उत्पन्न झालेल्या नंदा नावाच्या गायीला उद्देशून हे व्रत केले जाते. या दिवशी गायीची पूजा करतात. एकवेळ उपास करून संध्याकाळी गायीची पूजा वासऱ्यासह करतात. या दिवशी काही गोष्टी करणे वर्ज्य मानले आहे. चला तर मग जाणून घेऊ या की या दिवशी काय करावे आणि काय करू नये.

**काय करू नये-**

- गोवत्स एकादशीला गहू मूग खात नाही तसेच दूध आणि दुधाचे पदार्थ, तळलेले आणि तव्यावरील पदार्थ खाणे वर्ज्य असल्याची आख्यायिका आहे.
- केस कापणे किंवा नखे कापणे : या दिवशी केस किंवा नखे कापू नका, कारण ते नकारात्मक ऊर्जा आणते.
- गायींचे पूजन : गायींना हळद-कुंकू लावून सजवा. त्यांना ताजे घास, गुड़, गव्हाचे धान्य आणि भाज्या अर्पण करा. गायींच्या पूजेचा लाभ घ्या.
- मांसाहार किंवा तामसिक भोजनः मांस, मद्य किंवा तिखट/मसालेदार पदार्थ खाणे टाळा. सात्त्विक व्रत किंवा शाकाहार ठेवा.
- गोवर्धन पूजा : गोवर्धन पर्वताची पूजा करा. मातीचा गोवर्धन बनवून त्याची पूजा करा आणि भगवान कृष्णाची कथा वाचा.
- विवाद किंवा नकारात्मक बोलणे : कौटुंबिक भांडणे किंवा नकारात्मक चर्चा टाळा, जेणेकरून शांती भंग होणार नाही.दान-पुण्यः गायींसाठी किंवा गौशाळेसाठी दान करा (जसे घास, धान्य किंवा पैसा). ब्राह्मण किंवा गरजू व्यक्तींना दान द्या.
- प्राण्यांना इजा : कुणालाही प्राण्यांना (विशेषतः गायींना) इजा पोहोचवू नका किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका.
- व्रत आणि भोजन : दिवसभर व्रत ठेवा किंवा सात्त्विक भोजन (दूध, दही, फळे) घ्या. संध्याकाळी पौर्णिमेच्या तयारीसाठी दिवा लावा.
- कर्ज किंवा आर्थिक निर्णय : नवीन कर्ज घेणे किंवा मोठे आर्थिक निर्णय घेणे टाळा, कारण हा दिवस स्थिरतेसाठी आहे.

**काय करावे-**

- या दिवसापासून अंगणात रांगोळी काढून दिवाळीची सुरुवात होते.
- घरी गुरे, वासरे असणाऱ्यांकडे ह्या दिवशी पुरणा-वरणाचा स्वयंपाक करुन नैवेद्य दाखवला जातो.
- सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सायंकाळी संवत्स म्हणजे वासरासह असलेल्या गायीचे पूजन करतात.
- सवाष्ण बायका गाईच्या पायावर पाणी घालतात.
- नंतर हळद-कुंकू, फुले, अक्षता वाहून फुलांची माळ त्यांच्या गळ्यात घालतात.
- निरांजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणपोळी वगैरे पदार्थ वाढून गाईला खाऊ घालतात.
- स्त्रिया बाजरीची भाकरी व गवारीच्या शेंगाची भाजी खाऊन उपवास सोडतात.
- आपल्या मुला-बाळांना चांगले आरोग्य मिळावे व सुख लाभावे म्हणून ही पूजा करतात.
- या दिवशी दूध, दुधाचे पदार्थ, तळलेले पदार्थ खात नाहीत.
- घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे.
- गोवर्धन पर्वताची पूजा करा. मातीचा गोवर्धन बनवून त्याची पूजा करा आणि भगवान कृष्णाची कथा वाचा.
- गायींसाठी किंवा गौशाळेसाठी दान

# वसुबारस निमित्त गायीची आरती

धेनू माय जगत जननी, लोकत्रय त्रिताप शमनी।

अखिल जगतास मोक्ष दानी, जिचे नि सालकृंत अवनी
निगमागम जिला गाती
निगमागम जिला गाती
वंदीती सुरवर मुनिजन। पुनित पतित जन।
घेता दर्शन।
प्रियकर शिव सांबा, सुरभि सौख्यद जगदंबा ।।१।।

गोमुत्रात वसे गंगा, कमला गोमयात रंगा।
अखिल देवता जिचे अंगा, सदाजी प्रियकर श्रीरंगा।
जियेचे नेत्र सूर्यचंद्र
छक्ष्एः उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मानव-बिबट्या संघषार्संदर्भात झालेल्या बैठकीचे निकाल शेअर केले
जियेचे नेत्र सूर्यचंद्र
पहा उपेंद्र गोकुळी। कृष्णवाळ अवतार नखाग्री। गोवर्धन धरुनी।
रक्षी गोवत्स कृपा करुनी ।।२।।

धेनू माय...



# दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी

## वसुबारस निमित्त दारासमोर काढा सुबक व सोप्या रांगोळी

दिवाळी म्हटलं की रांगोळी आलीच. दिवाळी सणाला दारासमोर रांगोळी काढतात. दिवाळी रांगोळीच्या या स्पेशल डिझाइन पाहाच

यंदा दिवाळी सणाची सुरुवात १७ ऑक्टोबर रोजी येत आहे. शुक्रवारी वसुबारस येत आहे. वसुबारसला दारासमोर काढा या सुबक रांगोळी

गोवत्स द्वादशी हा एक हिंदू सांस्कृतिक आणि धार्मिक सण आहे जो विशेषतः महाराष्ट्रात दिवाळी उत्सवाची सुरुवात वसु बारसपासून सुरू होते.

वसुबारसेच्या दिवशी तुम्ही ही साधी सोप्पी रांगोळी काढू शकता. शेजारीही तुमचं कौतुक करतील.

रांगोळी हे शुभ आणि मांगल्याचं प्रतिक मानलं जातं. त्यामुळं सणाच्या दिवशी रांगोळीही काढलीच जाते

वसुबारस या दिवशी गाईची पूजा केली जाते. त्यामुळं रांगोळीत तुम्ही गायी आणि वासरू यांची रांगोळी काढू शकता.

तुमच्या घरासमोर जागा कमी असेल तर अशी छोटीशी रांगोळीदेखील तुम्ही काढू शकता. गाय आणि वासरु यांचे चित्र रेखाटून तुम्ही रांगोळीही काढू शकता. ही रांगोळी पाहून शेजारीही कौतुक करतील.

रांगोळीचे विविध रंग वापरून तुम्ही दारासमोर सुंदर अशी गाय वासराची रांगोळी काढू शकता.



# वसुबारसला दूध-दही खाण्याची परंपरा का आहे? जाणून घ्या कारण

वसुबारस हा हिंदू धमार्तील एक महत्त्वाचा सण आहे, जो दिवाळीत येणाया सणांपैकी एक सण आहे. या दिवशी विशेषतः गायी आणि वासरांचे पूजन केले जाते. या दिवशी दूध आणि दही खाण्याची परंपरा आहे आणि यामागे धार्मिक आणि सांस्कृतिक कारणे देखील आहे. तसेच वसुबारसला दूध-दही खाण्याची परंपरा ही गायीच्या पावित्र्याशी, समृद्धीशी आणि सात्त्विक आहाराशी जोडलेली आहे. ही परंपरा धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक मूल्ये आणि गायीच्या योगदानाची कृतज्ञता व्यक्त करते.

- **गायीचे पावित्र्य –** वसुबारस हा गायीला समर्पित सण आहे. गाय हिंदू धर्मात पवित्र मानली जाते आणि ती लक्ष्मीस्वरूप मानली जाते. गायीचे दूध, दही, तूप यांसारखे पदार्थ पवित्र मानले जातात. या दिवशी दूध आणि दही खाऊन गायीप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते आणि तिच्या उत्पादनांचे महत्त्व स्मरणात ठेवले जाते.
- **समृद्धीचे प्रतीक –** गायीला संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. वसुबारसला दूध आणि दही यांसारखे पदार्थ खाणे हे लक्ष्मीच्या कृपेने घरात समृद्धी यावी यासाठी शुभ मानले जाते. दूध-दही खाणे हे घरात सुख, शांती आणि समृद्धी आणणारे मानले जाते.
- **सात्त्विकता –** दूध आणि दही हे सात्त्विक आहार मानले जातात. वसुबारस हा सण दीपावलीच्या आधी येतो, जेव्हा लोक उपवास किंवा सात्त्विक आहार घेण्यास प्राधान्य देतात. दूध आणि दही यांचा आहार हलका, पौष्टिक आणि पचायला सोपा असतो, जो या सणाच्या उपास आणि पूजेसाठी योग्य मानला जातो.
- **कृषी संस्कृतीशी नाते –** भारतात गायींचे पालन आणि कृषी संस्कृती यांचा जवळचा संबंध आहे. वसुबारस हा सण ग्रामीण भागात विशेष उत्साहाने साजरा केला जातो, जिथे गायींच्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा वापर रोजच्या जीवनात महत्त्वाचा आहे. या दिवशी दूध-दही खाणे हे गायींच्या योगदानाला मान देण्याचे प्रतीक आहे.
- **परंपरागत रीतिरिवाज –** वसुबारसला गायी आणि वासरांना सजवून त्यांची पूजा केली जाते. या पूजेचा भाग म्हणून दूध आणि दही यांचा नैवेद्य अर्पण केला जातो. त्यानंतर हे पदार्थ प्रसाद म्हणून खाल्ले जातात, जे शुभ आणि पवित्र मानले जाते.



# हिंदू धर्मात गाईचे महत्त्व-वसुबारसच्या निमित्ताने जाणून घ्या

दिवाळी काही दिवसातच सुरु होत आहे. व दिवाळी दिवसांमधील एक महत्वाचा दिवस म्हणजे वसुबारस होय. वसुबारसला गाय आणि वासरूची पूजा केली जाते. तसेच वसुबारस हा सण हिंदू धर्मात गायीला समर्पित आहे. हिंदू धर्मात गायीचे विशेष महत्त्व अधोरेखित करतो. गाय हिंदू र्मात पवित्र आणि पूजनीय मानली जाते, आणि वसुबारसला तिचे पूजन करून तिचे आशीर्वाद घेतले जातात.

**गायीचे हिंदू धर्मातील महत्त्व–**

- **लक्ष्मीचे प्रतीक –** हिंदू धर्मात गायीला ''कामधेनू'' म्हणजेच सर्व इच्छा पूर्ण करणारी मानली जाते. ती माता लक्ष्मीचे स्वरूप मानली जाते, जी संपत्ती आणि समृद्धीची देवता आहे. वसुबारसला गायीची पूजा केल्याने घरात सुख, शांती आणि समृद्धी येते अशी श्रद्धा आहे.
- **गायीचे दूध गोमूत्र –** गायीचे दूध आणि गोमूत्र हे हिंदू धर्मातील पूजा, यज्ञ आणि धार्मिक विधींमध्ये पवित्र मानले जातात. वसुबारसला दूध-दही खाण्याची परंपरा याच कारणामुळे आहे, कारण हे पदार्थ सात्त्विक आणि पवित्र मानले जातात.
- **गाय जीवनाचा आधार –** भारत हा कृषिप्रधान देश आहे, आणि गायींचे कृषी संस्कृतीत मोलाचे योगदान आहे. गायीचे शेण आणि गोमूत्र खत म्हणून वापरले जाते. वसुबारस हा सण गायीच्या या योगदानाचा सन्मान करतो आणि ग्रामीण जीवनात तिचे महत्त्व अधोरेखित करतो.
- **आयुर्वेदात महत्व –** गायीला सात्त्विक प्राणी मानले जाते, जी पर्यावरण संतुलन राखण्यास मदत करते. तिचे शेण आणि गोमूत्र यांचा वापर आयुर्वेदात औषधी म्हणून केला जातो.
- **वैदिक संदर्भ –** वैदिक साहित्यात गायीला संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानले आहे. भगवान श्रीकृष्ण यांचा गायींशी विशेष संबंध आहे, कारण ते ''गोपाळ'' आणि ''गोविंद'' म्हणून ओळखले जातात. वसुबारसला गाय आणि वासरांचे पूजन करणे हे श्रीकृष्णाच्या भक्तीशीही जोडलेले आहे.
- **सामाजिक मूल्य –** गायीला माता मानून तिची सेवा आणि संरक्षण करणे हे हिंदू धर्मातील कर्तव्य मानले जाते. वसुबारस हा सण समाजाला गायीच्या संरक्षणाचे आणि तिच्या योगदानाचे महत्त्व स्मरण करून देतो.



## 'नाहीतर आडवे करू', शिंदेंच्या बालेकिल्ल्यात महायुतीत राजकारण तापलं

# केडीएमसी निवडणुकांआधी काय घडतंय?

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता जवळ येऊ लागल्या आहेत. त्यामुळे राजकीय वातावरण चांगले तापले आहे. ऐन दिवाळीत राजकीय फटाके वाजू शकतात. अंबरनाथ आणि बदलापूर नगरपालिकांमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेची शिवसेना आणि भाजप हे विरोधात उभे राहणार असल्याची जोरदार चर्चा चालू आहे. यातच आता कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये सुद्धा शिंदेची शिवसेना आणि भाजपा हे एकमेकांच्या विरोधात उभे राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. बदलापूरमध्ये आमदार किसन कथोरे आणि अजित पवारांची राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना शिंदे गट अशी निवडणूक होताना दिसू शकतो. तसाच फॉर्म्युला हा अंबरनाथ नगरपालिकेमध्ये सुद्धा होऊ शकतो. त्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकामध्ये सुद्धा महायुतीमध्ये तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे.

शिंदेच्या शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांनी भाजपला इशारा देणारं वक्तव्य केलं आहे. ''याल तर सोबत, नाहीतर आडवे करू. कुणाला वाटत असेल बिना युतीने, कुठलंही काम न करता आम्ही निवडून येऊ शकतो, तर आम्ही स्वतः लढायला तयार आहोत'', असं म्हणत शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरविंद मोरें यांनी भाजपला थेट 'ओपन चॅलेंज' दिलं आहे.

अरविंद मोरे यांच्या वक्तव्याला भाजपचे जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी जशास तसे उत्तर दिलं. ''अरविंद मोरे यांनी तरी निदान आडवे पाडण्याची भाषा करु नये. कारण मागच्या निवडणूकीत आमच्या सचिन खेमाने यांनी त्यांना आडवं पाडलं होतं. त्यांना प्रसिद्धीसाठी काही राहीलं नाही. त्यामुळे ते काही ना काही बोलतात. युतीचा निर्णय हा वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल. त्यांनी त्याविषयी बोलू नये. पक्ष जो आदेश देईल त्यानुसार आम्ही काम करणार. आमच्या संघटनात्मक बैठका सुरु आहेत. युती कधी होईल, कोण करेल, काय होईल हे वरचे बघून घेतील. युती नाही झाली तर सर्व ठिकाणी उमेदवार लढण्याची ताकद, कुवत आणि धमक आमच्यात आहे'', असं प्रत्युत्तर नंदू परब यांनी दिलं.

दरम्यान, भाजप आणि शिंदे गटात शाब्दिक युद्ध रंगले असताना यावर मनसेने महायुतीमधील दोन्ही पक्षांना टोला हाणलाय. मनसे माजी नगरसेवक मनोज घरत यांनी शिंदे गट आणि भाजपवर निशाणा साधला आहे. ''त्यांचा फोकस हा केवळ युती होणार की नाही होणार यावर ठेवण्यासाठी हे वातावरण पेटवत आहेत. गेले २५ ते ३० वर्षे शिवसेना भाजपाचे सरकार केडीएमसीवर आहे. ३० वषार्पासून परिस्थिती जैसे थे आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग, सर्प दंशाने एका चिमुकलीचा मृत्यू होतो. रस्त्यावर खड्ड्यांचे प्रमाण तसेच दिवाळी दोन दिवसांवर आली. अजूनही रस्त्यावर खड्डे आहेत. धुळीचा सामना सर्वांना करावा लागत आहे'', असं मनोज घरत म्हणाले.

''नागरिकांच्या जीवाशी त्यांना काही पडलेले नाही. हे राजकारणी फक्त युती होणार की नाही होणार याविषयी झुंजवत आहेत.पण आता दोन्ही ठाकरे बंधू एकत्र झाले आहेत. संपूर्ण मराठी माणूस हा एकटवलेला आहे. आणि यांना हे जे कागदी घोडे नाचवतात आम्ही हे केलं ते केलं. यांना त्यांची जागा या महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणात ही सुज्ञ जनता नक्की दाखवेल'', अशी टीका मनसेचे मनोज घरत यांनी केली.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कधीही घोषणा होऊ शकते. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. अनेक पक्षांकडून तर छुप्या पद्धतीने सर्वेक्षण सुद्धा करण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता मुंबई, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबवली, पालघर, नाशिक या ठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडी एकत्र लढण्याचा नारा देतात की स्वबळावर निवडणूक लढतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पण ठाण्यात मात्र महायुतीला सुरूंग लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. कारण, एकीकडे भाजपाने स्वबळाची चाचपणी करण्यास सुरुवात केलेली असताना दुसरीकडे शिवसेना शिंदे गटानेही बैठक घेऊन स्वबळाचा नारा दिला असल्याची माहिती समोर आली आहे. बुधवारी (ता. १५ ऑक्टोबर) आनंद आश्रममध्ये खासदार नरेश मस्के यांच्या उपस्थितीत ठाण्यातील शिवसेना नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक निवडणुकीच्या पूर्व तयारीसाठी बैठक पार पडली. या बैठकीमध्ये भाजपाबद्दल नाराजीचा पाढा वाचण्यात आला. पदाधिकाऱ्यांकडून भाजपाचे पदाधिकारी शिवसेना नगरसेवक पदाधिकारी करत असलेल्या विकासकामांमध्ये अडथळे आणण्यात असल्याचा तक्रारी केल्या. त्यामुळे खासदार नरेश मस्के यांनी नगरसेवक आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण, ठाणे महापालिका स्वबळावर लढा, अशी मागणी नगरसेवक तसेच शिवसेना पदाधिकाऱ्यांनी खासदार नरेश मस्के यांच्याकडे केली. तर, महायुती म्हणून लोकसभा, विधानसभा लढलो, आता नागरिकांसमोर जाताना ठाणे महापालिकेत युती म्हणून लढावं ही आमची इच्छा आहे. समोरच्याची इच्छा नसेल, तर गेली १० वर्ष त्याच्याआधी सुद्धा वेगवेगळे लढून एकहाती सत्ता आणतच होतो. त्यामुळे आमची प्रत्येक वॉर्डात तयारी आहे, असे म्हणत म्हस्केंकडून अप्रत्यक्षपणे का असेना पण एकला चलो रे चा नारा देण्यात आला आहे. तर, दुसरीकडे आज गुरुवारी (ता. १६ ऑक्टोबर) ठाण्यात भाजपाच्या इच्छुक उमेदवारांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये 'अबकी बार ७० पार' आणि 'महापौर भाजपाचाच होणार' अशी भूमिका भाजपाच्या पदाधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. यावेळी ठाणे भाजपाच्या १८ मंडळातून ४१६ इच्छुकांनी या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. यावेळी, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, शहर अध्यक्ष संदीप लेले, भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. त्यामुळे भाजपाने ठाण्यात स्वबळाचा नारा दिल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. ज्यामुळे आता शिवसेना शिंदे गटानंतर भाजपानेही स्वबळाचा नारा दिला असून यामुळे आता महायुतीला ठाण्यात सुरूंग लागणार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. पण या स्वबळाच्या नाऱ्यामुळे आता भाजपा आणि शिवसेनेमध्ये कोल्डवॉर सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे.

## महापालिकेची अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध!

# प्रभाग,नगरसेवकांची संख्या ठरली



**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तयारीसाठी पूर्वीच्या अस्तित्वात असर्णाया जुन्याच प्रभाग रचनेप्रमाणे नव्याने जैसे-थे ठेवत निवडणूक आयोगाने अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केली आहे. मिरा-भाईंदरमध्ये एकूण २४ प्रभाग व ९५ नगरसेवक संख्या असणार आहे. तशी अंतिम अधिसूचना निवडणूक आयोगाच्या मंजुरीनंतर पालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी जाहीर केली आहे. महापालिकेत २०१७ साली कायम केलेल्या प्रभाग रचनेनुसार आता महापालिका व निवडणूक आयोगाकडून अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. प्रसिद्ध झालेल्या अंतिम प्रभाग रचना जुन्या प्रभागाप्रमाणेच असून त्यात काहीही बदल झालेले नाहीत. प्रभागाची संख्या ही २४ प्रभाग व ९५ नगरसेवक असणार आहेत. तशी अंतिम प्रभाग रचना पालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांनी प्रसिद्ध केली आहे. राज्य सरकारच्या जुन्या निर्णयानुसार चार सदस्यीय प्रभाग असणार आहे. त्यामुळे मिरा -भाईंदर शहरात ४ नगरसेवक असलेले २३ प्रभाग असतील तर १ प्रभाग हा ३ नगरसेवकांचा राहणार आहे.

**पालिकेची मुदत २७ ऑगस्ट २०२२ साली संपली**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची २०१७ सालच्या पंचवार्षिक निवडणूक झाली होती. त्यानंतर पालिकेचा कार्यकाळ २७ ऑगस्ट २०२२ रोजी संपला होता. तेव्हापासून ३ वर्ष ८ दिवसांपासून प्रशासक विराजमान आहे. पालिका आयुक्त हेच प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत.

# वाळू घाटांचे लिलाव पंधरा दिवसांत!

## दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाई करणार : बावनकुळे

**■मुंबई। प्रतिनिधी,**

पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यात मोठ्या प्रमाणावर वाळूची आवश्यकता भासणार असून, त्यामुळे वाळू घाटांचे लिलाव वेळेत करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना दिले. या कामात दिरंगाई करण्यावर कडक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.

वाळू धोरण आणि वाळू गटाबाबत महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत आढावा घेण्यात आला. अपर मुख्य सचिव विकास खारगे उपस्थित होते. तर, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज, सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

राज्यात कोणत्याही परिस्थितीत वाळू टंचाई निर्माण होऊ नये. वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया तातडीने पूर्ण करून सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा. वाळूचा अवैध उपसा व वाहतूक थांबवण्यासाठी कठोर कारवाई करावी. वाळू माफियांवर कारवाई होईलच पण, वाळू चोरी झाल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला



पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळालेल्या वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया तत्काळ पूर्ण करण्याचेही निर्देश महसूलमंत्र्यांनी दिले. पर्यावरण परवानगी प्रक्रिया सुलभ होण्यासाठी महसूल आणि पर्यावरण विभागाने समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. राज्यातील वाळूसाठ्यांची तपासणी करून माहिती अद्ययावत करण्याचेही निर्देशही यावेळी देण्यात आले.

**कुणबी प्रमाणपत्र देताना दक्ष रहा!**

कुणबी जात प्रमाणपत्र देताना कोणतीही चूक होऊ नये, याची विशेष काळजी घ्यावी. सर्व कागदपत्रांची काटेकोर तपासणी करावी आणि चुकीची जात प्रमाणपत्रे देण्यात येऊ नयेत, असेही बावनकुळे स्पष्ट केले.

**पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत द्या !**

बैठकीदरम्यान मंत्री बावनकुळे यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत पोहोचवावी, असे निर्देश सर्वच विभागीय आयुक्तांना दिले. शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भातील माहिती दररोज शासनाला सादर करावी.

# ठाण्यातील सर्व ग्रामपंचायती होणार डिजिटल... ४३१ ग्रामपंचायतींसाठी स्वतंत्र संकेतस्थळांची निर्मिती

**■ठाणे। प्रतिनिधी,**

सध्याचे युग डिजिटल झाले असून, आता जिल्ह्यातील ग्रामपंचायत कार्यालयेही डिजिटल मार्गावर येणार आहेत. ठाणे जिल्हा परिषदेने प्रशासनातील पारदर्शकता आणि कामकाजातील वेग वाढवण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यातील सर्व ४३१ ग्रामपंचायतींना डिजिटल स्वरूप देण्यात येणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीचे स्वतंत्र संकेतस्थळ तयार करण्यात येणार असून, नागरिकांना आपल्या गावाची सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

या संकेतस्थळावर सरपंच, उपसरपंच व सदस्यांची माहिती, ग्रामपंचायतीचा दैनंदिन कारभार, शासनाच्या विविध योजना, मालमत्ता कर, पाणीपट्टी, जमा-खचार्चा तपशील, स्वामित्व मालमत्ता कार्ड, नमुना ८ आदी सर्व माहिती पाहता येईल. यामुळे ग्रामपंचायतींच्या कारभारात पारदर्शकता वाढून नागरिकांना सोयीस्कर आणि सुलभ सेवा मिळणार आहेत.

ठाणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या कार्यकाळात जिल्हा प्रशासनात डिजिटल कामकाजाला गती मिळाली.



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावर फाईल, प्रस्ताव व परिपत्रक प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली. त्याच धर्तीवर आता ग्रामपंचायतींच्या कामकाजातही डिजिटल प्रणालीचा अवलंब करण्यात येत आहे.

''ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर माहिती कशी अपलोड करावी, तसेच संकेतस्थळाचे संचालन कसे करावे, याचे प्रशिक्षण संबंधित कर्मचाऱ्यांना दिले जात आहे. पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले असून, दुसऱ्या टप्प्यानंतर ही संकेतस्थळे प्रत्यक्ष कार्यान्वित केली जाणार आहेत.''

**- प्रमोद काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

# कल्याणमधील रस्त्याची दुरवस्था... काँग्रेसचे उपोषण

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

कल्याण पूर्वेतील श्रीकृष्णनगर ते पत्री पूल मार्गे नवी गोविंदवाडीपर्यंत जाणारा रस्ता पूर्णपणे उखडून गेला असून, खड्ड्यांनी या रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्यावर साचलेले पाणी आणि चिखलामुळे वाहनचालक, शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले आहेत. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीच कार्यवाही न झाल्याने काँग्रेसचे पदाधिकारी शकील खान यांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. या दरम्यान, स्थानिक नागरिक आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी अनोख्या पद्धतीने निषेध व्यक्त करत रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये



झाडे लावली. तसेच या रस्त्याला प्रतीकात्मकरीत्या अभिनव गोयल मार्ग असे नाव देत केडीएमसी आयुक्तांविरोधात नाराजी व्यक्त केली. दरम्यान, नागरिकांनी प्रशासनाच्या कारभाराविरोधात नाराजी व्यक्त करत या रस्त्याची स्थिती इतकी बिकट झाली आहे की, शाळकरी मुलांना रोज खड्ड्यांतून मार्ग काढावा लागतो. रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य तयार झाल्याने अनेक वेळा अपघाती घटना घडत असताता, असे होत असताना देखील प्रशासन दुर्लक्ष करत आहेत. या परिसरात चार शाळा असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

''महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी तातडीने हा रस्ता दुरुस्त करावा अन्यथा मोठ्या प्रमाणावर तीव्र आंदोलन छेडले जाईल. खड्ड्यांमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे आणि केडीएमसी प्रशासन मात्र गाढ झोपेत आहे. दरम्यान, पावसाळ्याच्या काळात कल्याण-डोंबिवली परिसरातील बहुतेक रस्त्यांची स्थिती अत्यंत वाईट झाली आहे. चार महिन्यांपासून नागरिक खड्डेमय रस्त्यांवरून प्रवास करत आहेत, तर केडीएमसीकडून फक्त डांबर टाकण्याचा दिखावा केला जात आहे.''

**- शकील खान, काँग्रेस नेते**

# उच्च न्यायालयासाठी २,२२८ पदांची निर्मिती

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाकरिता नव्याने २ हजार २२८ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मंजुरी देण्यात आली आहे.

न्यायालयीन कामकाज गतीने होण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती. त्याचबरोबर न्यायालयीन कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्तेचा जास्तीत जास्त वापर करुन कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने २ हजार २२८ पदे निर्माण करण्यात आली आहेत. न्यायालयीन प्रक्रीया



गतिमान होण्याच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सुविधेसाठी या पदाची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई येथील मूळ शाखा व अपील शाखा आणि औरंगाबाद व नागपूर खंडपीठाकरिता गट-अ ते गट-ड संवर्गात अतिरिक्त पदांची निर्मिती करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पदनिर्मिती करण्याच्या प्रस्तावाला मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

# राम मंदिर स्थानकावर अवतरला रँचो अन् अवघडलेल्या गर्भवतीची झाली प्रसुती

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईकरांची लाईफ असलेली मुंबई लोकल सतत धावत असते. या लोकलमध्ये घडलेल्या अनेक आठवणींचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर येत असतात. काही व्हिडीओ, फोटो एक मनोरंजनाचा भाग देखील असतात. स्थानकांवरील प्रचंड गर्दी असो किंवा ट्रेनमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची रोजची होणारी धडपड असो, सोशल मीडिया अशा व्हिडीओंनी भरलेला असतो. महत्त्वाचे म्हणजे अनेकदा मुंबई लोकल ट्रेनमध्ये गर्भवती महिलेची प्रसुती झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र आता मुंबईच्या राम मंदिर स्थानकावर गर्भवतीच्या प्रसुतीसाठी रँचो अवतरल्याचे पाहायला मिळाले. ३ इडियट्स चित्रपटात जसं आमिर खान करीना कपूरच्या बहिणीची प्रसुती करताना दिसतो, तसेच काहीसे चित्र राम मंदिर स्थानकावर घडल्याचे पाहायला मिळाले.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री १२.४० च्या सुमारास एक गर्भवती गोरेगाव रेल्वे स्थानकावरून मुंबईकडे लोकल ट्रेनने



प्रवास करत होती. प्रवास करत असताना अचानक तिला तीव्र प्रसुती वेदना सुरू झाल्या. ती मदतीसाठी ओरडू लागली. परंतु तिच्या मदतीसाठी कोणीही धावून आले नाही. याचवेळी तिच्याच डब्ब्यातून प्रवास करणारा विकास बेद्रे या तरुणाने तत्काळ ट्रेनची इम्रर्जन्सी चैन ओढत राम मंदिर रेल्वे स्थानकावर लोकल थांबवली. परंतु राम मंदिर स्थानकावर तातडीने कोणतीही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नव्हती. तसेच रुग्णवाहिका पोहोचायलाही वेळ लागणार होता. तर दुसरीकडे गर्भवतीला प्रचंड वेदना होत होत्या. तिचे बाळ अर्धे बाहेर आणि अर्धे आत अशा नाजूक स्थितीत अडकले होते. त्यामुळे हा प्रसंग पाहून विकास बेद्रे याने जराही वेळ न घालवता तत्काळ त्याची मैत्रिण असलेल्या डॉ. देविका देशमुख हिला व्हिडीओ कॉल केला आणि परिस्थितीची माहिती दिली.

परिस्थितीची जाणीव होताच डॉ. देविका देशमुख हिने विकासला शांतपणे प्रसूतीची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगितली. वैद्यकीय शिक्षणाचा कोणताही अनुभव नसतानाही विकासने धैर्य आणि संयम दाखवला. त्याने डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक सूचना काळजीपूर्वक पाळली. अखेर त्याच्या प्रयत्नांना यश आले आणि राम मंदिर रेल्वे स्थानकावर रात्री १.३० ते २ वाजण्याच्या सुमारात बाळाच्या रडण्याचा आवाज घुमला. त्या महिलेने गोंडस मुलीला जन्म दिला आणि उपस्थित प्रवाशांसह रेल्वे कर्मचाऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने आई आणि बाळाला तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात हलवले आहे. तसेच दोघांचीही प्रकृती सध्या सुखरूप असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. महत्त्वाचे म्हणजे या तणावपूर्ण आणि जीवघेण्या प्रसंगी विकास बेद्रे याने दाखवलेले धैर्य आणि समयसूचकता हे खरोखर कौतुकास्पद आहे.

# सपासप भोसकून तरुणाची हत्या करणारा पसार, अन् पोलिसच अडकला

**■नागपूर। प्रतिनिधी,**

नंदुरबार शहरात युवक जय वळवी याची १६ सप्टेंबर रोजी हत्या झाला होती. घटनेतील संशयित याची गुन्हेगारीचा पूर्व इतिहास माहिती असताना देखील त्याच्यासोबत पोलीस कर्मचारी राहत होता. तसेच गुन्हा घडतेवेळी संशयितास ताब्यात घेणं, पोलीस ठाण्यात कळविणे आवश्यक असतानाही हलगर्जीपणा केल्याप्रकरणी पोलिस अधीक्षकांनी पोलीस कर्मचाऱ्याला शासकीय सेवेतून बडतर्फ केलं आहे.

नंदुरबार शहरातील सिंधी कॉलनी परिसरात १६ सप्टेंबर रोजी जय वळवी या युवकावर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आलं होतं. त्यानंतर उपचारादरम्यान युवकाचा १७ सप्टेंबर रोजी मृत्यू झाला होता. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सूर्यकांत सुधाकर मराठे याची गुन्हेगारी पार्श्वभूमी असताना देखील पोलीस कर्मचारी त्याच्यासोबत राहत होता. तसेच गुन्हा घडताना संशयितास ताब्यात घेणं अथवा पोलिस ठाण्यात कळविणे आवश्यक असतानाही



चौधरी यांनी हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत पोलिस अधीक्षकांनी शासकीय सेवेतून बडतर्फ केलं आहे.

दरम्यान, पोलिस दलात शिस्त, प्रामाणिकपणा व पारदर्शकता त्यास यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात येते. नियमबाह्य वर्तन केल्यास कठोर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, असं पोलिस अधिक्षक श्रवण दत्त एस. यांनी सांगितलं. याप्रकरणी हत्येनंतर जिल्हाभर युवकाच्या हत्येप्रकरणी संशयित आरोपीविरुद्ध कठोर कारवाईसाठी जिल्ह्यात बंद पाळण्यात आला होता. तसेच वेगवेगळ्या ठिकाणी मोर्चा काढण्यात आला होता.

या घटनेनंतर सर्व आदिवासी संघटना व आदिवासी समाज आक्रमक झाला होता. या हत्येतील आरोपींवर कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी करत या घटनेच्या निषेधार्थ तमाम आदिवासी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्हास्तरीय मूक मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चा शांततेत पार पडल्यानंतर काही उपद्रव्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील उभ्या असलेल्या गाड्यांची तोडफोड केली होती. याप्रकरणी पोलिसांनी अनेकांना अटक केली आहे.

नंदुरबार शहरातील बाजारपेठेच्या परिसरात एका किरकोळ वादातून तरुणावर चाकूने सपासप वार करत हत्या केली. ही घटना 16 सप्टेंबरला घडली होती. या घटनेनं नंदुरबार शहरात एकच खळबळ उडाली. यामुळे आदिवासी समाज हा संतप्त झाला होता. संबंधित प्रकरणात आरोपीला कडक शिक्षा व्हावी या मागणीसाठी नंदुरबार जिल्ह्यात हत्येच्या निषेधार्थ मुक मोर्चा काढण्यात आला होता. या मोचार्ला हिंसक वळण प्राप्त झालं होतं. आंदोलकांनी काही वाहनांची तोडफोड केल्याचं देखील समोर आलं होतं.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com